# गंगाजल नेचर फौंडेशन, मुंबई

नोंदणी क्रमांक - ई २४४३१ (मुंबई)

निसर्गसंवर्धन पर्यावरण संस्कृतीजतन

## गंगेच्या नावनं चांगभलं !

बिहार एक अशी भूमी जिथे भगवान महावीर आणि भगवान बुध्द यांचा सहवास जास्त काळ होता. इथेच मगध साम्राज्याचा उदय झाला. इथल्या गंगेच्या धारेने विष्णूगुप्ताचा धुरंधर चाणक्य होताना पाहिलय. त्याच चाणक्यांनी दासीपूत्राला सम्राट चंद्रगुप्त बनवून एक महान साम्राज्य निर्माण करून भारतीयांना चाणक्यनीती बहाल केली. याच भूमीने स्वतंत्र भारताला पहिल्या राष्ट्रपतीच्या रुपाने 'प्रसाद' दिला, तर इथूनच 'अंधेरे में एक प्रकाश ! जयप्रकाश ! जयप्रकाश !' चा बुलंद आवाज निघाला. कोणे एके काळी या भूमीत सोन्याचा धूर निघत असे, गंगेच्या पाण्यावर समृध्द, सधन असलेला हा प्रदेश आज मात्र डाकूंचा आणि बुध्दीमत्तेन दिवाळखोर समजावेत अशा राजकर्त्यांचा प्रदेश म्हणुन जगभर ओळखला जातोय. भारतातील मेट्रो शहर म्हणून ओळखली जाणारी मुंबई, दिल्ली, कोलकात्ता या शहरांची डोकेदुखीः ठरु पहातोय.

एक दिवस सकाळी भगवान बुध्द आणि त्यांचा शिष्य आनंद, भिक्षेसाठी मगधनगरीत फिरत होते. एके ठिकाणी खूप मोठा जमाव पाहून भगवंतानी आंनदला विचारले.

" आंनद, ते काय करताहेत ?"

आंनद म्हणला.

"भगवंत ! ते पाटलीपूत्र नगरीचा पाया भरताहेत."

हे ऐकून भगवान बुध्द म्हणाले.

" येथे एक समृध्द नगर उभा राहील ज्याची ख्याती जगभर पसरेल पण या नगराला आर्तंगत कलह आणि पाण्यापासून धोका होईल आणि त्यात हे नगर नष्ट होईल." भगवान बुध्दांनी देशाटन खुपच केले होतं त्यामुळे त्यांच भौगोलीक ज्ञानही तसच अगाध होतं. दक्षिणे कडून येणारी सोननदी आणि उत्तरेकडून येणारी गंगानदी याच्यां त्रिभूज प्रदेशात वसलेल्या पाटलीपूत्र नगराला असलेला पाण्याचा धोका भगवान बुध्दांनी ओळखला होता.

मगध साम्राज्य तसेच सम्राट चंद्रगुप्ताच्या काळातील अर्तंगत कलह आजच्या बिहारमध्ये एकंदरीत नग समजावेत अशा राज्यकर्त्याच्या रुपाने आजही खदखदत असल्याच दिसून येतं तर गंगानदी सोबत कोसी, गंडक आणि घागरा या नद्यां मगध भूमीला किंवा आताच्या बिहारला वर्षांनुवर्षे वारंवार पूराच्या पाण्यात बुडवून, भगवान बुध्दांचे बोल खरे ठरवित आहेत.

कोणत्याही वृत्तवाहिणीवर बिहारमधील बातम्यांतून पूरस्थिती गंभीर असल्याच ठळकपणे उठून दिसत होते. काळाच्या ओघात नद्यां आपला प्रवाह थोडयाफार फरकाने बदलत असतातच पण 'बिहारचे अश्रू' म्हणूनच ओळखली जाणा-या कोसीनदीच्या प्रवाहात सत्तर वर्षात प्रथमच मोठया प्रमाणात बदल झाल्याने उत्तर बिहारमध्ये हाहाकार माजला. एंकदरीत पंधरा जिल्हयातील तीस लाखांहून जास्त लोकांना या महाभयंकर पूराचा तडाख बसला आहे. मधेपूरा, सहरसा, आरारिया हे जिल्हे तर अक्षरशः जलमय झाले होते. यामुळे जनजीवन तर विस्कळीत झाले आहेच पण अनेकांना आपल्या प्राणास मुकावे लागले आहे. अनेकजण उपाशी अवस्थेत घरांच्या इमारतीच्या छतावर जीव मुठीत धरुन मदतीच्या प्रतिक्षेत होते. अनेकांच्या अनेक प्रकारेच्या मदतीचा ओघ सुरु आहे तो पूरग्रस्तांना योग्यप्रकारे मिळो हिच अपेक्षा.

पूर ओसरल्यावर चोर पावलानीं येईल ती महामारी आणि साथीचे आजार, त्यामुळे थैमान माजेल ते वेगळेच असेल. आता हा भाग अलहीदा की आदरणीय रेल्वेमंत्री श्री. लालुप्रसाद यादव यांनी बिहार वासीयांसाठी देशभरात कोठेही जाण्यासाठी रेल्वेप्रवास मोफत जाहीर केला आहे. त्या मुळे कोलकाता, दिल्ली आणि मुंबई या शहरांवर अतिरिक्त भार आणखीणच वाढेल. काळाच्या ओघात आम्ही भारतवासीय (ज्यांनी या महापूराची झळ सोसलेय ते सर्व सोडून) हे सार विसरुन जाऊ पुन्हा कोसी, गंडक आणि घागरा किंवा गंगा या पैकी एकाद्या नदीचा प्रवाह बदलून पुन्हा पूर अथवा महापूर येईपर्यंत.

बिहारमध्ये हे नेहमी का घडत ? याचा मुळासी जावून आम्ही भारतीय कधी विचार तरी करणार आहे का ? अनेक विदेशी जलतज्ञांनी व निसर्गप्रेमींनी कधी तटस्तपणे तर कधी भारतावरच्या प्रेमापोटी अशा समस्याच्या मुळासी जाण्याचा धाडसी प्रयत्न केल्याच दिसून येतं. आणि आम्ही मात्र एकाच्या प्रयत्नाने काय फरक पडणार आहे ? किंवा सरकारदरबारी त्याची कोणी दखल घेईल का ? हे काम सरकारचे आहे ! या विवंचने मुळे तसा प्रयत्नच करताना दिसत नाहीत.

केवळ थेम्सनदीच्या काठी बालपण गेल या पार्श्वभूमीवर एक विदेशी त्यानां गंगानदीचे आकर्षण निमार्ण होत. आणि ते आपल्या आयुष्यातील वीस वर्षे भारताची जीवनरेखा म्हणून ओळखली जाणारी महानदी गंगा हीच्यावर अभ्यासार्थ खर्ची घालतात. आपली निरीक्षणे, अंदाज, निष्कर्श तसेच गंगा प्रदुषणावर काम करणा-या अनेक स्वंयसेवी संस्था तसेच व्यक्ती यांच्यासी संवाद साधतात. त्या सगळयांची मत संकलीत करतात. शासकीय संस्था तसेच अधिकारी व मंत्री यांच्याशीही संवाद साधतात त्या बरोबरच सर्वसामान्यांही ते विसरत नाहीत त्याचां गंगानदी विषयी असलेला आदर ते हळूवार शब्दात माडंतात. गंगानदीचा पौराणिक संदर्भ तिचे धार्मिक महत्व यांचे पदर उलघडण्याबरोबरच शेतीसाठी गंगानदीच्या पाण्याचा होणारा अतीवापर तसेच कारखानदारी व नागरीवस्त्यांच्या सांडपाण्यामुळे होणा-या गंगाप्रदुषणावर ते टीकेची झोंड उठवतात. तितक्याच हळुवारपणे गंगाजळातील अगम्य गुढ, त्याला आपण अमृत का म्हणतो ते उलघवडण्याचा भावस्पर्षी प्रयत्नही करतात. आणि तेवढयाच कठोर पणे गंगेच देवत्वच गंगानदीच्या मुळावर आलय हे ही पटवून देतात. कानपूर ते कोलकाता हा प्रवास बोटीतून करण्यासाठी लागणा-या अनुमतीसाठी केंद्रसरकारच्या प्रशासकिय अधिका-याच्या भेटी दरम्यान **'फराक्का'**

बांधाच्या संदर्भात काहीही न लिहण्याची प्रशासकिय अधिका-याची सूचना फेटाळून केवळ सर्वसामान्य भारतीयांना कळावे म्हणून बिहारमधील आजच्या पूरस्थितीला जबाबदार असलेल्या फराक्का बांधावर अभ्यासपुर्ण असे एक प्रकरण लिहीतात.

त्या गंगावेडया फिरंगी लेखकाच नाव आहे **ज्युलियन क्रॅडॉल हॉलिक**. एक सजग पत्रकार आणि लेखक, रेडिओवरील विविध कार्यक्रमाचे निर्माते, इस्लाम आणि दक्षिण अशिया या विषयावरील रेडिओसाठी बनविलेल्या मालिकांना विविध पुरस्कार, मॅसॅच्युसेट्स येथे न नफा या तत्वावर सुरु असलेल्या इन्डिपेण्डंट ब्रॉडकास्टिंग असोसिएअस् या कंपनीचे सहसंस्थापक, एनपीआर, बीबीसी रेडिओ, फोर आणि बीबीसी वर्ल्ड सर्व्हिस तसेच टोरोंटो येथील बीबीसी रेडिओसाठी अनेक कार्यक्रम स्वतंत्रपणे सादर, मुंबईतल रेडिओ मिड- डे साठी एका साप्ताहीक मालिकेची निर्मिती, स्मिथ्सेनिअन मॅगेझिन द न्यू रिपब्लिक या नियतकालिकांमध्ये भारता विषयी विपुल लिखाण, द टाइम्स ऑफ इंडिया आणि द हिन्दू या वृत्तपत्राचे स्तंभलेखक असी त्यांची लांबलचक ओळख करुन देता येईल.

आणखी उशीर होण्यापुर्वी या नदीला श्वास घेण्याची फुरसत द्यायला हवी. त्या साठी संघटित लोकशक्तीचा दबाव आणून राजकीय इच्छाशक्ती या प्रश्नाकडे वळवणे, हाच गंगानदीला वाचवण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. गंगामाईला वाचवणे आता सर्वसामन्याच्याच हाती असल्याचे प्राजंळपणे सांगतात, ते त्यांच्या 'गंगा' या पुस्तकातून. त्याच्यां मुळ इंग्रजी भाषेतील पुस्तकाचा मराठीत अनुवाद केला आहे प्रसिध्द पत्रकार श्री. प्रकाश अकोलकर यांनी तर प्रकाशक आहेत श्री. उल्हास लाटकर, अमेय प्रकाशन, पुणे. गंगा प्रदुषणसारख्या विषयावरील मुळ इंग्रजी भाषेतील पुस्तक, मराठी भाषेत प्रकाशीत करुन या गंभीर पण भारतीयांच्या जीवन मरणाचा तसेच निसर्गाच्या संवर्धनाचा प्रश्नावर प्रकाशझोत टाकून एक प्रकारे समाज प्रबोधनाचे काम प्रकाशक श्री. उल्हास लाटकर करीत आहेत. त्या बदल त्यांचे गंगाजल नेचर फौंडेशन हार्दिक अभिनंदन करीत आहे.

'गंगा' यापुस्तकात 'फराक्का बांधा' विषयी ज्युलियन हॉलिक काय म्हणतात ते त्याच्यांच शब्दात –

कानपूरला आणि काही प्रमाणात वाराणशीलाही प्रशासकीय यंत्रणेचं अपयश बघायला मिळालेल. फराक्काला मात्र माणुस निसर्गाचे किती धिंडवडे काडू शकतो याचं उत्तम उदाहरण पहायला मिळतं. अनेकाना फराक्का निव्वळ शब्दही एक शिवीच वाटत असतो. भारत सरकारचे अधिकारीही फराक्काचा उल्लेख झाला की, अस्वस्थ होतात. माझ्या पुस्तकात मी फराक्काचा उल्लेख करु नये, असा आग्रहही त्यांच्या पैकी अनेकांनी या यात्रेसाठी विविध परवानग्या जमा करताना धरलेला असतो.

भारत सरकारने गंगेच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवून त्याची दिशा आपल्या हातात ठेवण्यासाठी पश्चिम बंगाल आणि बांगलादेश यांच्या सीमेवर १९७० सालीच बांध घातला होता तोच 'फराक्का.' पण जलशक्तीमुळे होणरे परिणाम ध्यानात न आल्यामुळे त्याची मोठी किंमत मोजावी लागली आहे. पावसाळ्यात विषेशता: बिहारमध्ये गंगेमुळे जमिनीची धूप मोठया प्रमानावर होते. नेपाळमधून पाण्याचे असंख्य प्रवाह धूपणी घेवून येत गंगेला मिळतात. फराक्का धरणामुळे पाण्याला पुढे जाण्यास वाट मिळत नाही. परिणामी दरवर्षी कहलगाव ते फराक्का या १०० कि.मी. टप्प्यातील असंख्य खेडी उद्ध्वस्त होत असतात. गोमुखापासून वाराणसीपर्यंत दैवी रुपात सामोर येणा-या गंगानदीला, नेपाळ मधून आलेल्या घागरा, गंडक आणि कोशी या नद्यांचे प्रवाह मिळाल्या नंतर गंगानदीचा विध्वंसक चेहरा समोर येतो. वर्षानुवर्षे शेतजमीन, माणस, जनावरांचा घास ती घेत आहे. त्या मुळे साहजिकच या भागात तिची रक्षणकर्ती, जीवनदार्ती अशी प्रतिमा कुठेही शिल्लक राहिलेली नसते.

माल्डा जिल्हयातील पंचनदपूर या गावी आम्हाला प्राद्यापक डॉ. कल्याण रुद्र यांनी भेटायला बोलावलेलं असतं. डॉ. कल्याण रुद्र हे उत्तर बंगाल विद्यापीठात भूगोल विषय शिकवतात. फराक्का बांधामुळे झालेले परिणाम त्यांना आम्हाला दाखवायचे असतात. राजमहलचा मुक्काम आवरून गंगेच्या दक्षिण किना-यापासून आम्ही निघतो. झारखंड हे नवं राज्य अस्तित्वात येईपर्यंत हे गाव बिहारमध्ये होतं. इथे गंगेच्या पात्रात असलेल्या छोटया छोटया बेटांवर चाचे आणि डाकू यांचं राज्य असतं. आमच्यासारख्या एकाकी प्रवास करणा-या नौकांवर हल्ला करून लूटमार करायचा असा त्यांचा रियाज असल्याची माहिती अम्हाला मिळते. समोरच्या किना-यावर पश्चिम बंगालची हद्द सुरु होते. एकच देश; परंतू पुर्णपणे वेगळ वेगळ विश्व. राजमहल हे या पठाराच पुर्वत्तर टोक. इथे सगळीकडे ग्रेनाईट आणि बेसॉल्ट खडक आढळतात. नदीचा प्रवाह हे कठीन खडक भेदू शकत नाहीत. त्या मुळे या पटटयात दगडाच्या खाणी आणि दगड फोडायचे क्रशर आहेत. या पटटयात नदी सरळ रेषेत पुढे जाते, जरा वाट सापडल्यावर पुर्वेला वळते आणि बंगालच्या उपसागराकडे धाव घेते.

अखेर पंचमनदपूर टप्प्यात येत. दगडी फरश्याच बांधकाम असलेल्या मोठया धक्क्यावर असंख्य माणस आमची वाट पहात असतात. डॉ. कल्याण रुद्र आम्हाला एका बांबूच्या कुटीत घेवून जातात. गावप्रमुख जलालूद्दीन अहमद यांच्या बागेत आमचा तळ उभारला जातो. कल्याण रुद्र ही गर्दीत उठून दिसणारी व्यक्ती बिलकूलच नसते. लहानखोरी शरीरयष्टी, सौम्य बोलणं आणि कसलाही गंड नसणं. ते सखेल विचार करणारे ग्रहस्थ असतात. शहरी असूनही गावक-यांनी त्यांना पुर्णपणे स्विकारलेलं असतं. अत्यंत बुध्दिमान आणि काम वरच्या दर्जाचं असूनही ते उत्तर बंगालच्या एका फारशी ओळख नसलेल्या कॉलेजमध्ये शिकवत असतात. प्राद्यापक आपला नकाशा पसरतात. फराक्का बाधंमुळे गेल्या तीस वर्षात गंगानदीच्या पात्रात आणि प्रवाहात कसे बदल घडत गेले, हे समजवायला लागतात. पुर्वी गंगानदीच्या पात्राच्या सीमारेषा स्पष्ट होत्या. त्या परीघातच तीचा प्रवास व्हायचा; परंतू फराक्का बांधामुळे गंगानदीच्या हालचलीमध्ये मोठे बदल घडून आले. प्राद्यापक डॉ. कल्याण रुद्र तेरिकूलच्या संघटनेच कार्य सांगू लागतात. गेल्या दहा वर्षात माल्डा जिल्हयातील आठलाख लोकांची घरे गंगेच्या पूरामुळे वाहून गेलेली असतात. त्यातील बरेच जण गंगानदीच्या दक्षिणेला म्हणजेच झारखंडमध्ये गेलेले असतात.

मोनोतोश शहा हा डॉ. कल्याण रुद्र यांचा सहकारी आम्हाला गावात फेरुफटका मारयला घेवून जातो. गंगानदीच्या पूरा मुळे काय संहार झालाय ते दाखवतो. नदीवरचा धक्का नवीनच बांधलेला असतो. आधीचा धक्का पूरात वाहून गेलेला. त्या जून्या धक्क्याच्या काही स्लाईडस आम्ही पहातो. माल्डा

शहरातील शाळेत भूगोल विषय शिकवणा-या मेहंदी हसनने हे फोटो काढलेले असतात. नदीच्या पात्रात दिसणारा बांध आत्ता गंगानदीच्या पात्रात १०० मिटर पुढे गेला आहे. मेहंदी आम्हला दुसरी स्लाईड दाखवतो, विटांची दोन मजली इमारत आणि आजूबाजूला घनदाट जंगल दिसतं. “या इमारतीला गंगाभवन अस नाव होत. पंचमनदपूरच्या गंगा किना-यालगतच ही वास्तू होती.”

“पण ती आज आम्हला दिसली नाही ?” मी विचारतो.

“होय ! आणखी काही वर्षे दिसणारही नाही. कदाचित काही वर्षानंतर ती पुन्हा प्रकटेल पलिकडच्या तिरावर. गेल्याच वर्षी शाळा आणि पोलीस स्टेशन पाण्याच्या पडदयाआड गेलय.” मेहंदी सांगतो.

मला धक्काच बसतो. गंगनदी दरवर्षी दोनशे मीटर गावाकडे सरकतेय ?

“कधी जास्त तर कधी कमी. फराक्का बांधा मुळे या भागाची भू-रचनाच बदलली आहे. तीस वर्षापुर्वी पंचमनदपूर गंगा किना-या पासून तीस किलोमीटर दूर होत. पुढच्या वर्षी पंचमनदपूरच पाण्याखाली जाईल,माझ्या वडिलांच घरही राहणार नाही.” हसन व्याकुळ होवून सांगत होता.

रुहूल इस्लाम हा गायक आम्हाला बंगाली लोकसंगीत ऐकवतो. गंगेनं लोकांचा जमीनजुमला, घरंदारं सर्वस्व लुटल्याच्या करुण कहाण्या तो आपल्या गीतातून ऐकवतो पंचमनदपूचा विनाश त्यात शब्दबध्द केलेला. पूर, जमिनीची धूप आणि बेघर होणं इकडच नेहमिच वास्तव. एका गीतातून रुहूल आपल वैयक्तिक दु;ख पेश करतोय. त्याच घर, शेती, होडी सर्व पूरात वाहून गेलेलं. माल्डा जिल्हयातील आठ लाख लोकांपैकी दोन लाख लोक निवा-याच्या शोधात दक्षिनेच्या दिशेने गेलेले.

पश्चिम बंगाल हा हिंदू वैष्णव पंथ आणि इस्लाम हातात हात घालून नांदणारा प्रदेश. गुलाम महम्मद मुस्तफा आणि जलालुद्दीन शेख यांच्या कोळी गीतांतून जाणवतं. ज्येष्ठ बंगाली कवी नझरुल इस्लाम यांची भटीयाली कवणं ते सादर करतात. हिंदू वैष्णव पंथ आणि इस्लाम यांचा सूफी गीतांत झालेला संगम काहीसा धक्कादायक वाटतो. सगळीच गीतं करुण, गुढ. गंगेच्या पूरानं किती अन् कशी लूट केली याची शोकांतीकाच त्या गीतांतून साकार होत गेलेली.

पंचमनदपूरला रात्री जेवणानंतर जलालुद्दीन या कुटुंब प्रमुखाबरोबर गप्पा रंगलेल्या. “चाळीस वर्षापुर्वी हे गाव म्हणजे वैभवशाली बंदर होतं.” जलालुद्दीन सांगू लागतात “राजमहल गावाबरोबर आमचा भरपूर व्यापार चालायचा. इथे निळ बनवायचा एक कारखाना होता. ब्रिटिशांनी तो सुरु केला होता. पण पुढे १९६९ पासून आमच्या वाताहतीला सुरवात झाली सगळं सगळं गेल. आम्ही काहीच करु शकलो नाही. माझ्या डोळयासमोर सार काही नाहीसं झाल. निळीचा कारखाना बघता बघता नाहीसा झाला. माझी सतरा एकर जमीन पाण्याखाली गेली.”

मोनोतोश शहा म्हणतो “कोलकाता बंदर रहदारीसाठी सुरु ठेवल्या मुळे या भागात गंगानदीच्या प्रवाहात सारखे बदल होत आहेत.” तीन महिन्यापुर्वीच त्याच घर आणि आमराया पाण्याखाली गेल्या आहेत. त्या मुळे तो अत्यंत उद्विग्न झालाय. केवळ पश्चिम बंगाल सरकारवरच त्याचा राग नाही तर केद्रं सरकारवरही तो तितकाच वैतागला आहे. “फराक्का बांधामुळे काय परिणाम होतील याचा सरकारने विचारच केला नाही. बांगलादेशाला कस हैराण करता येईल याचाच फक्त ते विचार करतात. बांधाचा तसा काहीच उपयोग होत नाही. गाळ साचल्यामुळे त्याची निम्मी दार तर कायमच बंद असतात. याच वर्षी पश्चिम बंगाल सरकारने गंगानदीच्या तीस किलोमीटर लांबीच्या किनारपटटीच्या कामासाठी २७५ कोटी रुपये खर्च केले. पण त्याचा काय उपयोग झाला ? सगळे रुपये पाण्यातच गेले. ते गावक-यानां भरपाई म्हणुन द्यायला हवे होते. तुम्ही गंगानदीवर नियंत्रण ठेवू शकत नाही हे वास्तव आता स्विकारायलाच हवं. पुढच्या वर्षी हे पंचमनदपूरही नाहीसं झालेल असेल पहाच.” मोनोतोश कुत्सित हास्य करत म्हणतो.

सौरव सारंगी या डॉ. कल्याण रुद्र यांच्या फिल्ममेकर स्नेहयानं पंचनदपूरच्या पूर प्रश्नावर ‘भांगोन’ नावाची एक फिल्म बनवली आहे. त्यात गंगानदीला निर्बंध घालण्याचे शासकीय अधिका-यांचे खटाटोप प्रभावीपणे दाखवले आहेत. नदीच सुसाट पाणी किण-यावरची ताडाची गच्च झाडी अन् आमराया गिळकृत करत असतानाची दृश्यं फिल्ममध्ये बघायला मिळतात. पाण्याचं हे भिषण आणि रौद्र रुप पाहणंच केवळ गावक-यांच्या हाती उरतं. काही क्षणापुर्वी आपण उभे असलेली जमीन पाण्याखाली जाताना बघणं किती हादरवून टाकणार असतं, याचा प्रत्यय ‘भांगोन’ ही फिल्म पाहताना येतो.

फराक्का हे कोलकात्याच्या उत्तरेला ३५० किलोमीटर अंतरावर आहे. फार पुर्वी म्हणजे १८५२ मध्ये इस्ट इंडिया कंपणीला, कोलकाता बंदर म्हणून आणखी किती काळ टिकाव धरु शकेल या बाबत चिंता निर्माण झाली होती. नेहमीच्याच कारणांनी बंदर गाळानं भरत चाललं होतं. तेव्हा कंपनीनं प्रख्यात इंजिनिअर सर ऑर्थर कॉटन यांना गंगानदीचा प्रवाह वळवून तो हुबळीनदीत सोडण्याची सूचना केली होती. ही सूचना करण्यामागे कोलकाता बंदरातला सगळा गाळ समुद्राला जावून मिळावा, अशीच कल्पना होती. या सूचनेचा अभ्यास करण्यात आला आणि अखेर ती फेटाळून लावण्यात आली. बेंगॉल चेंबर ऑफ कॉमर्स या संघटनेन हा मुद्या १९३० मध्ये पुन्हा हातात घेतला. खर्च किती ? व्यवहारिकता किती आणि जलशक्तीवर होणारे परिणाम काय ? देव जाणे ! कारणं काहीही असोत, भारत सरकारनं १९६० मध्ये ही कल्पना प्रत्यक्षात आणायचं ठरवलं. पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी ? ( तेव्हा आत्ताचा बांगलादेश पुर्वपाकिस्तान म्हणुन पाकिस्तानचाच भाग होता.) कोलकाता हे राजकीय डावपेच आणि आर्थिक शक्ती या दोन्ही दृष्टीनं भारतासाठी अत्यंत महत्वाचं आहे. हुबळीही गाळानं भरत चालली होती. आणि बोटींच आकारमान वाढल्यानं त्यांची खोलीही वाढत होती. त्यामुळे भारत सरकारने हा बाधं उभारुन गंगानदीचं पाणी हुबळीत सोडावं, जेणेकरुन कोलकात्याला नदी साफ होऊ न जाइल, असा निर्णय घेतला; पण बांध फराक्कालाच का ? अन्यत्र कुठे, उदाहरणार्थ राजमहलला का नाही ?

यावर फराक्काचे माजी चिफ इंजिनिअर पी. के. परूआ सांगतात की, या बांधासाठी राजमहलची निवड कधीही होऊ शकली नसती; कारण तिथं गंगेचं पात्र जवळपास पाच ते सहा किलोमीटर इतकं रुंद आहे तर फराक्का इथं दोन ते तीन किलोमीटर इतकं. पण सर्वात लक्षणीय बाब ही आहे की, मुळ प्रश्न जे काही होते, त्यांची उत्तंरच दिली गेली नाहीत.

१) हुबळी नदीत येणा-या पाण्याच प्रमाण आधीच कमी होऊ लागल होत का ?

२) कोलकाता बंदर गाळानं भरुन जाण्यामाग काही अन्य कारणं तर नाहीत ना ?

३) हुबळीत गंगेच पाणी आणून सोडल्यानं कोलकाता बंदर खरोखरच साफ होणार आहे का ?

४) या सर्वासाठी कमी खर्चात आमलात आणता येतील, असे उदाहरणार्थ, कोलकाता बंदर जरा खालच्या अंगाला वसवणं, या सारखे अन्य तोडगे नव्हते काय ?

५) बांगलादेशा बरोबरच भारतीयांच्या जीवनावर होण-या परिणामांचं काय ?

भारत सरकारनं या प्रकल्पाच्या अभ्यासासाठी १९५१ ते १९७१ अशी चांगली वीस वर्षे घेतली. पाकिस्तानचा संताप झाला होता; पण त्यांना निषेध व्यक्त करण्यापलीकडे काही करता येत नव्हतं. अखेर भारत सरकारनं निर्णय घेतला. अशिया खंडातील सर्वात मोठा बांध फराक्का येथील काळया कसदार गाळावर उभा राहणार होता. बांधाच्या अलिकडेच एका फीडर कॅनॉलमधून गंगानदीचं पाणी वळवून ते भागीरथी-हुबळीत सोडण्यात येणार होत. पुढे त्याच पाण्यानं कोलकाता बंदरातला सगळा गाळ धुऊ न निघणार होता. आणि बंदर वाहतुकीसाठी आधीक मोकळ होणार होतं. ही मांडणी अगदी तर्कशुध्द भासत होती. (पण प्रत्यक्षात तस घडणार होतं का ? याच उत्तर मात्र भविष्यकाळाच्या उदरात दडलं होतं.)

त्यांनी कामाला सुरवात केली आणि १९७१ ते ७५ अशी पाच वर्षे खर्ची घातल्यावर बांध उभा राहीला. कोणत्याही आंतरराष्ट्रीय कराराविना त्याचा वापरही सुरु झाला. पाण्यात गाळ किती साठू शकेल, याचा सरकारनं विचारच केला नव्हता. पण फराक्काची उभारणी करताना जलशास्त्रात अगदी प्रथमदर्शनी सामो-या येण-या वास्तवाकडेही दुर्लक्ष करण्यात आलं होतं. एखाद्या पावसाळी नदीवर जर तुम्ही भक्कम असा बांध घालण्यात याशस्वी झालाच तर त्यामुळे नदीच्या प्रवाहातील वेग आणि आवेग यावर नक्कीच परिणम होणार, हे गृहीत धरायला हवं. अखेरीस गंगानदीच्या प्रदिर्घ लांबीच्या प्रवाहातील गाळ जाणार होता तरी कुठे ? गाळाच प्रमाण बघता, तो साराच्यासारा गाळ बांध ओलांडून तर पुढे जाण शक्यच नव्हतं. मग तो बांधाच्या मागे अगदी वेडयावाकडया पध्दतीने साठत राहण्यापलीकडे दुसर होणार तरी काय ?

डॉ. कल्याण रुद्र सांगतात की, १९७५ मध्ये फराक्का बांध कार्यान्वित झाल्यापासून नदीप्रवाहानं तिथं येऊ न जमा झालेल्या प्रचंड वाळूमुळे पात्रचा तळ २३ फूट वर उंचावला गेला आहे. मात्र फराक्काच्या या उथळ जलाशयात चिखल-माती बिलकूलच नाही आणि पाणी अगदी नितळ आहे. आश्चर्याची बाब म्हणजे पाश्चिमात्य लोक हीच बाब नदीच्या उत्तम प्रकृतीच लक्षण मानतात ! भारतात मात्र नदी चिखल-मातीनं भरलेली असेल,तर ती निरोगी सुदृढ प्रकृतीची समजली जाते. संथ आणि नितळ पाणि म्हणजे कुंठलेला प्रवाह. हे सगळ घडलंय बांधापाशी साठत गेलेल्या गाळामुळे.

दर सत्तर वर्षांनी गंगानदीचा प्रवाह तीस किलोमीटरच्या परिघात कुठेही फिरतो. फराक्काच्या बांधामागे साठलेल्या गाळामुळे नदी अस्थिर झाली आहे. फराक्काचे आराखडे तयार करणा-या इंजिनिअर्सनां याची जराही कल्पना नसावी ? माझी आणि फराक्काचे चिफ इंजिनिअर पी. के. परूआ यांची शेवटची भेट २००५ झाली, तेव्हा मी त्यांना फराक्कात काही गाळ साठत जात आहे काय ? असा प्रश्न विचारला असता ते माझ्याकडे आश्चर्याने पाहतच राहीले होते. मी त्यांना सांगीतले की, फराक्काचे जवळपास निम्मे दरवाजे गाळाने भरुन गेले आहेत, बांधाच्या वरच्या अंगाला पाण्याची खोली दहा फुटापेक्षाही कमी झाली आहे आणि पाण्याचा तळ २३ फुटांनी वर उचलला गेला आहे. ते त्यावर विश्वास ठेवायला तयार नव्हते. फराक्का हा पांढरा हत्ती होऊ न बसलाय, हे डॉ. कल्याण रुद्र यांच मत अन्याय कारक असल्याचं परूआ यांना वाटतं. फराक्का बाबत भारतात करण्यात येत असलेल्या आरोपांचा प्रतिवादही ते जोमानं करतात. पण प्रत्यक्षात जे काही घडल आणि घडत राहील, त्या मुळे फराक्काचे चिफ इंजिनिअर पी. के. परूआ यांची गृहीत चुकीची असल्याचच निष्पन्न झाल आहे. नाखुषीने का होईना, फराक्का हे मच्छीमारांसाठी मोठं संकट ठरलयं, हे ते मान्य करतात; त्याचवेळी फिडर कॅनॉलमधून होणा-या नियमित पाणीपुरवठयामुळे फराक्कानं भागिरथी-हुबळीला जिवनदानच दिलंय असही सांगून टाकतात. फराक्काच्या बांधमुळे झालेल्या महाप्रचंड नुकसानीचा कुठलाही पुरावा ते मान्यच करायला तयार नव्हते.

पश्चिम बंगालमध्ये राहणा-या किती लोकांना गंगानदी बांगलादेशातूनही वाहते हे ठाऊ क असेल ? असा प्रश्न मला नेहमीच पडत आलाय. बांगलादेशात गंगा ही पद्मा या नावाने ओळखली जाते. बंगालच्या दोआबच्या भूगोलाच अगदी प्राथमिक ज्ञान जरी भारत सरकारच्या अधिका-यांना असत, तरी त्यांनी फराक्का बांध बांधण्याचा निर्णय घेताना दोनदा विचार केला असता !

महत्वाचा मुद्दा हा आहे की, ज्या उद्देशानं फराक्का बांध उभारण्यात आला, ते उद्देश तेवढया प्रमाणात सफल झाले नाहीत. गंगानदीचं ४० हजार क्यूसेक्स पाणी सिमेंट कॉंक्रिटच्या कॅनॉलमधून भागिरथी-हुबळीनदीत सोडण्यात आलं का ? कोलकाता बंदरातला गाळ साफ झाला का ? तिथं मोठी जहाज वा गलबतं येतच नाहीत. गाळ तिप्पट झालाय आणि एकूण परिस्थिती 'जैसे थे' च आहे.

भारतीय राजकारणी फराक्का बांध कधी काळी मोडीत काढतील, असं मला वाटत नाही. त्यामुळे आता हा प्रश्न गंगामैयालाच आपल्या हाती घ्यायला लागणार आहे !

फराक्का बांध भारताच्या आणि मानवाच्याही अंतिम विनाशाचं प्रतिक तर बनणार नाही ना ?

- इती ज्युलियन हॉलिक.

---

भारतीयांच्या मनात गंगेच नेमक स्थान आहे तरी काय ? हिमालयातल्या डोंगरद-या पार करून थेट कोलकात्याच्या सगर बेटापासी बंगालच्या उपसागराला जाऊ न मिळणारी ही महानदी. या नदीच्या नुसत्या दर्शनाने कोटयावधी भारतीयांचे हात आपोअपच जोडले जातात आणि गंगाजल म्हणजे साक्षात अमृत. गंगास्नान आणि ‘गंगाजल’ प्राशन या दुहेरी योगानंतर स्वर्गाची दार हमखास खुली होतात, अशी मनापासून श्रध्दा असलेले आम्ही भारतीय या नदीचा इतका -हास कसा काय करु शकतो ?

एक, बोचरा प्रश्न विचारुन लेखका बरोबर प्रकाशकही थांबतात.

शंभर करोड पेक्षा जास्त लोकसंखेच्या या भारतात किती लोक गंगा शुध्दीकरणाच्या किंवा गंगानदीला वाचवण्याच्या विरोधात असतील ? कोणताही पक्ष, कोणतीही संघटना किंवा सर्वसामान्यांपैकी कोणी विरोधक असणं शक्यच नाही. अस असताना बहुमताच्या मुद्यावर ही समस्या कधीच सुटायला पाहिजे होती पण तसं झाल नाही ही वास्तूस्थिती आहे. याला कारण राजकीय इच्छाशक्तीचा अभाव या बरोबरच, आम्ही काय करणार ? हे सरकारच काम आहे असे म्हणत सगळी जबाबदरी झटकून टाकायची ही सर्वसामान्याची भुमिकाच गंगानदीच्या मुळावर उठल आहे, आता गरज आहे प्रत्येक भारतीयांनी भागिरथी होण्याची. सेतूसमुद्रम, रामजन्मभूमी, बाबा अमरनाथ अशा अनेक मुद्यावर केंद्र सरकारला जागे करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर जनआंदोलन होतात आणि ती यशस्वीही होतात. मग हिंदू संस्कृतीची जननी, समस्त भारतीयांची जीवनरेखा आणि श्रध्देच्या अढळ स्थानावर विराजमान असलेली मोक्षदायीनी गंगामाता, हीच्या संवर्धनासाठी राष्ट्रीय स्तरावर जनआंदोलन का होत नाही ? गंगानदीच्या खो-यातून ८० खासदार लोकसभेवर जातात. याच प्रमाणे आमदार किती ? नगरसेवक किती ? तर जिल्हापरिषद आणि ग्रामपंचायत पातळीवरचे लोकप्रतिनीधी तसेच सर्वसामान्य या सगळयांनी जागे होण्याची वेळ आता आली नाही का ? या बरोबरच ज्या राज्यातूनं गंगानदी वाहत नाही, त्यांनी ही समस्या आपली नाही अस समजण्याच मुळीच कारण नाही. गंगानदीच्या पूरा मुळे अथवा तिच्या प्रदुषणाचे परिणाम हे दूरगामी आणि सार्वत्रिक आहेत. कोलकाता, दिल्ली, मुंबई, या मेट्रो शहरांवर, गंगानदीच्या परिणामानां कंटाळलेल्या पर प्रांतीयांचा भार वाढतो आहेच शिवाय हा भार भविष्यात इतर राज्यांतील अनेक शहरांवर येणार नाही का ? जागो भारतवासी जागो अन्यथा गंगानदी विना भारत म्हणजे विनाश ! विनाश ! आणि विनाशच !

विजय मुडशिंगीकर
अध्यक्ष, गंगाजल नेचर फौंडेशन, मुंबई
vijaymudshingikar@gangajal.org.in

---